# कविवर्य द. रा. बेंद्रे यांची मराठी कविता कन्नड आणि मराठी कवितेचे संगमतीर्थ

क

विवर्य द. रा. बेंद्रे हे ख्यातनाम कन्नड कवी. अंबिकातनय दत्त या नावाने त्यांनी आपली काव्यरचना केली. मातृभाषा मराठी असलेल्या या कवीने कानडी भाषेत वैशिष्ट्यपूर्ण कविता लिहिली. कन्नड सरस्वतीचे ते कंठमणी ठरले. जीवनाच्या सम्यक् प्रवाहांना आकळणाऱ्या त्यांच्या चिंतनशील आणि सर्वस्पर्शी प्रतिभेचा गौरव अनेक समीक्षकांनी मुक्तकंठाने केलेला आहे. महाकवी कुमारव्यास यांच्या गुणवती प्रतिभेशी त्यांनी तिची तुलना केली आहे. अम्लान आशयाच्या आणि अभिजात सौंदर्याने विनटलेल्या या कवितेने रसिकांना आनंद दिलेला आहे. 'नाकुतंती' या त्यांच्या कवितासंग्रहात त्यांच्या परिणत प्रतिभेचा विलास आढळतो. या कविता संग्रहाला 'ज्ञानपीठ पुरस्कार' प्राप्त झालेला आहे.

१९१८ ते १९८१ या प्रदीर्घ कालखंडात कानडी कवितेबरोबरच कविवर्य द. रा. बेंद्रे यांनी मराठी कविताही लिहिली. कानडी काव्यनिर्मितीप्रमाणे ही रचना सातत्याने त्यांनी केली नाही. पण ती देखील सरस आहे. द. रा. बेंद्रे यांच्या १९६५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'संवाद' या मराठी ग्रंथात त्यांच्या ४४ कविता समाविष्ट करण्यात आल्या होत्या. द. रा. बेंद्रे यांचे सुपुत्र डॉ. वामन बेंद्रे यांनी त्यांच्या मराठी कवितांचा संग्रह 'उमाळा' या नावाने संपादित करून पितृऋण फेडलेले आहे. काव्यरसिकांची फार मोठी सोय त्यामुळे झालेली आहे. डॉ. बेंद्रे यांच्या विवेचक प्रस्तावनेमुळे आणि भावसंदर्भांमुळे कविवर्यांच्या काव्याच्या आस्वादप्रक्रियेस साह्य झालेले आहे. या कवितासंग्रहात एकूण ११३ कविता आहेत. त्यांत विविधता आहे. चिंतनगर्भ प्रतिभेच्या नव्या उन्मेषांचे मनोहर दर्शन त्यांतून घडते.

डॉ. सोमनाथ कोमरपंत

'उमाळा' मधील कविता अभ्यासताना केवळ मराठी कवितेचा संदर्भ ध्यानात घेऊन आणि द. रा. बेंद्रे यांच्या अनोख्या शब्दकळेकडे लक्ष केंद्रित करून भागणार नाही. या कवितांद्वारे या कविश्रेष्ठाच्या जीवनविषयक तत्त्वप्रणालींचा संदर्भ समजून घ्यावा लागेल. ऐंद्रिय सौंदर्य, काल्पनिक सौंदर्य, बौद्धिक सौंदर्य आणि आदर्श सौंदर्य ही सौंदर्याची चतुःसूत्री श्री अरविंदांनी मांडली होती. तिचा संकलित परिणाम द. रा. बेंद्रे यांच्या मनोविश्वावर झालेला होता. शिवाय कालिदास, जगन्नाथपंडित, श्रीमाता, कविवर्य रवींद्रनाथ टागोर, जे. कृष्णमूर्ती, महात्मा गांधी, खलिल जिब्रान या प्रतिभावंतांचा आणि प्रज्ञावंतांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. रॉबर्ट ब्राउनिंग, शेली, कीट्स, वर्डस्वर्थ, कोलरिज आणि शेक्सपियर या पाश्चात्य कवींकडूनही त्यांनी काव्यप्रेरणा घेतल्या होत्या. मराठीतील संतसाहित्याचे परिशीलन त्यांनी केलेले होते. अन्य मराठी साहित्य त्यांनी अभ्यासले होते. भारतीयांची अध्यात्मदृष्टी आणि पाश्चात्यांची सौंदर्यदृष्टी यांचा स्वरमिलाफ द. रा. बेंद्रे यांच्या मराठी कवितेत आढळतो. त्यांची काव्यसाधना ही त्यांच्या खडतर जीवनाचीही साधना होती. श्रद्धान्वित वृत्ती हा त्यांच्या प्रतिभेचा स्थायीभाव. सातत्याने तिने परिपूर्णतेचा व सुसंगतीचा वेध घेतला. कविवर्य बेंद्रे यांनी आपल्या उपजत प्रतिभेला चिंतनाची आणि अखंडितपणे व्यासंगाची जोड दिली. त्यामुळे त्यांच्या सृजनात्मक शक्तीचा परिपोष झाला.

कवी हा नश्वर असतो. त्याच्या कविता ही त्याची निःश्वसिते काव्यसाधनेद्वारा तो ईश्वराची पूजा करीत असतो. ही त्याची प्रक्रिया त्याच्या आयुष्यातील शेवटच्या श्वासापर्यंत अखंडीतपणे चालू असते. यावर द. रा. बेंद्रे यांची श्रद्धा होती. या चिंतनप्रक्रियेतून त्यांची कविता जन्मास येते. 'उमाळा' मधून या हृदयतरंगांचे उत्कट दर्शन

घडते.

'उमाळा' मधील 'महाराष्ट्र वंदन' या कवितेत ते महाराष्ट्रातील संतपरंपरेला आणि सांस्कृतिक शुभसंचिताला विनम्रवृत्तीने अभिवादन करतात ते उद्गारतात :

महामूर्ति ही महाराष्ट्राची
जागी झाली चिदंबरी
अमृत अमृत लहरी लहरी ।
सह्य शिखरिचे ज्योतिर्लिंग
प्रकट जाहले अष्टांग
त्याला माझा साष्टांग ।

जीवनातील सुसंगतीवर त्यांचे आत्यंतिक प्रेम असल्यामुळे विसंगतीवर ते जळजळीत भाष्य करतात :

.... मेल्यावर संतांची समाधी
सत्त्वपरीक्षा चाले आधी
समाधीपुढील प्रसाद - खादी
निःसत्त्वाच्या तोंडी (इशारा)

महाराष्ट्रातील स्वकालीन सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकतात कवी उद्‌गारतो उभ्या महाराष्ट्रात दोन आण्यांत 'गीताई' मिळते. कुरुक्षेत्रावर बाजारबुणगे आहेत. अर्जुनाचा पत्ता नाही. ज्ञानेश्वरी तर कधीच संपवली आहे. त्यानंतर यथार्थदीपिका - गीतारहस्य हे ग्रंथ पालथे पडलेले आहेत.

या अराजकाचं दर्शन घडविताना भेदक व उपहासव्यंजक शैलीचा आधार त्यांनी घेतलेला आहे. मनातील विषण्ण भावही त्यांनी प्रकट केला आहे :

.... मेलेल्यांच्या तोंडात माती
मेल्याचे श्रेय जिते खाती
मेलेल्यांची गीते गाती
सवंग जिवंत हुतात्मा

'हे चावुंडराजे करवियले' ही या संग्रहातील एक उल्लेखनीय कविता. गोमटेश्वराचे शिल्प पाहताना त्यांच्या अंतर्मनात अननुभूत आनंदाची ऊर्मी तरळते तिला शब्दरूप लाभते ते असे :

हे नव्हे शिलायुगातील शिल्प ।
यापुढे तदितर शील अल्प ।
हे अखंड अनंत कल्पानुकल्प । ऊर्ध्वगामी

ही भव्य सौंदर्यमूर्ती आहे. ही अहिंसा यागाची कीर्ती आहे. ही अलोट त्यागाची कधीही न ओसरणारी भरती आहे. असे कवीला वाटते. चिरंतन मूल्यांचा समुच्चय ज्याच्या ठायी झालेला आहे अशा पुरूषोत्तमाची ही मानसमूर्ती येथे साकारलेली आहे असे कवीला वाटत असावे. त्यांच्या सूत्रमय शब्दांत आयुष्यातील चिंतनाचा परिपाक आढळतो. भगवद्‌गीतेतील तत्त्वज्ञानाचा प्रभाव येथे जाणवतो :

जो वर्षावाने न भिजे ।
जो शिशिर हेमंती न थिजे ।
जो ग्रीष्म तापाने ने थिजे ।
निरंतर वसंतसखा ।

कवीच्या जीवनप्रणालीचा हृदयंगम आविष्कार या मिताक्षरांतून झालेला आहे :

हे धर्मफळ रसाळ गोमटे ।
एकदा उमलता जे न मिटे ।
भू - तृष्णेशी विटूनि उमटे ।
अद्‌भुत अकल्पित ।।

तिमिरातून तेजाकडे जाणारी पाऊलवाट दिसावी. त्यामुळे देहाला, आत्म्याला तल्लखी यावी हे स्वप्न कवीच्या अंतःचक्षूसमोर तरळत आहे. नव्या भूमीचा शोध लागल्याचा आनंद त्याला त्यातून मिळतो. त्याची जीवनश्रद्धा बळावते :

विजेसारिखा हवा
नच विझणारा दिवा
आत्मा ताजा नवा
खरी असली आहे हवा
त्यातही कसली आहे हवा ?
नवीन भुमी त्यातच दिसली
श्रद्धा माझी त्यावर बसली
अंतरिक्षि नव सृष्टी वसली
वाहु लागली हवा
मग, हाय वाटले जिवा !

कवीची चिंतनशील वृत्ती त्यांच्या अनेक कवितांतून काव्यात्म रूपाने प्रकट झाली आहे. कवीचा दुर्दम्य आशावाद 'दिगंबर' या कवितेतून आभिव्यक्त होतो. निसर्गाच्या स्वाभाविक प्रक्रियेतून जीवन-मृत्यूचे रहस्य त्याने सहजतेने उलगडून दाखविले आहे :

शिशिरात झडली पालवी ।
खोडास अंकुरण्या लावी ।
वसंत लावण्य प्रकटवी ।
नग्न करूनी ।।
सर्वांगनेत्री रमणी निशा ।
प्रकटता लपल्या बंधन दिशा ।
ताप लोपता मुक्त दशा ।
आपोआप ।

नव्या दिवसाच्या उदयाबरोबर जीवसृष्टीत चैतन्य पसरते. त्या उत्फुल्ल वातावरणाचे चित्र कवीने तन्मयतेने रेखाटले आहे :

उगवे दिन, फुलते वन
विविध स्फुरति विहगस्वन
हाच जीव; हे जीवन
पवनापरि पावन

जीवनाचे स्वरूप सांगताना कवी उद्‌गारतो : जे अवतीभोवती होते ते तेथे साकार होते. सत्य विविध रूपात प्रकटते. मूर्त स्वरूपात त्याचा आविष्कार होतो. भावातून प्रभावात ते परिणत होते. तमातून प्रकाशाकडे, दृष्टाकडून अदृष्टाकडे जीवनाचा विकास होत जातो. कवी हे समर्पक दृष्टान्ताद्वारे सांगतो :

जलधीतुन बेट उठे, मातीला कोंब फुटे
बघातुन गंध सुटे, फळ येता फूल मिटे
जसा फिरे जळि मासा, स्फुरती जीवी आशा
की डोळे तनुभरही, उजळल्या कि दाहिर्दीशा

(स्वप्न)

श्रेष्ठ काव्यात चैतन्य, रस आणि चमत्कार यांचा स्वरमेळ हवा असे अग्निपुराणात म्हटले गेले आहे. काव्यात मंत्रशक्ती असते. समकालीन जीवनापासून सनातन मूल्यांवर भाष्य करणारी कविवर्य द. रा. बेंद्रे यांची 'उमाळा' मधील कविता वाचत असताना या गुणांचा आविष्कार झालेला दिसून येतो. काव्य ही नुसती शब्दाची क्रीडा नसते. तो चिरंतन मूल्यांचा कविमनाने घेतलेला शोध असतो. याचा येथे ठायी ठायी येतो. कवीला लौकिकाचे भान आहे; तशीच अलौकिकाची ओढ आहे. पुंण्याचा संचय व्हावा अशी त्याची इच्छा आहे. पापाबद्दल त्याला तिरस्कार वाटतो. कवी उद्‌गारतो :

दुर्बिणीतून पाहातो काय
दूर दूर दूर
पायाजवळ आला पहा पापाचा हा
पूर
(ठिणग्या)

'प्रार्थना' या कवितेतील पुढील ओळींतून त्यांच्या जीवन धारणेवर प्रकाश पडतो :

हरुषे हसू, शोकी असू
जीव धर्मा धारणा
जनन सुरसा, मरण विरसा
समरसा म्हणु जीवना

'स्वानंदा'चा विलास वर्णिताना कवी म्हणतो, स्वानंद-वत्सलता फुललेली आहे, फळलेली आहे. जगभर पसरलेली आहे. ती नसानसांतून खेळविते, बोलाविते, डोलविते. ती जगते आणि मरते. पण ती अमर आहे. मृत्यूतून संजीवन प्राप्त करण्याचा ध्यास तिला लागलेला आहे. ती 'खोल खोल' चा जप करते. उगाच बहरते चित्तात विहार करते. सर्वांना जिंकून स्वतः हरते. गंधाप्रमाणे वाऱ्याबरोबर दरवळून जगाला 'जगा' म्हणते. इथे बसू या अथवा नभात विहार करू या. आत मग्न राहू नकोस खुल्या भल्या पाखरा, "उघड उघड" म्हणते. या सूत्रमय आशयातील सूचकता चित्कळेच्या गाभ्याला स्पर्श करणारी आहे. परिणतप्रज्ञ प्रतिभावंतांचे हे प्रकट चिंतन आहे. अद्वैताने भरलेल्या जगतात त्याला जळीस्थळी द्वैत दिसते तेव्हा त्याच्या आत्मकल्लोळाला शब्दरूप प्राप्त होते :

एक स्थळ, एक जळ
एक तेज वारा
बेकीमध्ये मरतोस का
देवाजीच्या पोरा. (ठिणग्या)

अद्वैतानुभूतीचे विलोभनीय दर्शन त्यांच्या 'बीज एकले' या कवितेतून घडते.

'प्रभा' या कवितेत जाणिवेच्या पातळीवर कविमन अनुभव घेते :




निलीमा अखंड पसरे नभी
मी चिरंतनातही उभी.... पाहते नक्षत्रांची सभा

पण बघता बघता स्वानंदमग्न अवस्थेत हे मन नेणिवेच्या अज्ञात, गूढ प्रदेशात प्रवेश करते

मिरवणूक ही लावण्याची प्रपंच कोंदाटले
डोळ्यांचे डोळसपण हे बघ बघता आटले
रूपाच्या यात्रेत आपले स्वरूप की थाटले
अहाहा ! आवरण ही फाटले
हे अघटित की भेटले.... जीवनी आले हे कोठले ?

कवीने योजलेल्या 'नक्षत्रांची सभा' 'लावण्याची मिरवणूक' आणि 'रूपाची यात्रा' या दृकसंवेदनात्मक प्रतिमासंघातामधून अपार्थिव सौंदर्याचा परमोच्च बिंदू गाठला जातो.

कवीच्या आस्तिक्यबुद्धीवर प्रकाश टाकण्याऱ्या अनेक कविता या संग्रहात आहेत. विठ्ठलावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. अनेक कवितांमधून त्याच्याविषयीचा कवीचा भाव प्रकटलेला आहे. 'उभा पांडुरंग', 'विठ्ठल', 'विठ्ठल पांडुरंग' व 'म्हणा विठ्ठऽलऽऽ विठ्ठल प्रेम म्हणा' या कवितांतून त्याचा महिमा कवीने वर्णिलेला आहे. संतकाव्यातून सन्ताला लागलेली अनंताची ओढ उत्कट स्वरात प्रकट होते, ती येथेही प्रकटलेली आहे. 'विश्वंभरु' या कवितेत 'जगज्जीवन विठ्ठला'चे मुक्तकंठाने गुणगान केले आहे. द. रा. बेंद्रे यांचा मनःपिंड अध्यात्मप्रवण आहे हे कवितांतून प्रत्ययास येते. कवी उद्गारतो :

समरस आनंदाच्या अनंत कळा
अभूत दृष्टीचा अपूर्व लळा
कोण पुरविणार असे वेगळा ईशावीण ॥
(काव्यात 'राम')

या तपस्वी कवीने काव्या द्वारा काव्यनिर्मिती प्रक्रियेवरील भाष्यही रसिक मनाला आल्हाद देते. निसर्गाचे साहचर आणि कविमनाची स्पंदनलय यांच्या स्वप्नसंगमातून काव्य बहरते असे कवीला वाटते. त्यांच्या या रचनेतील अल्पाक्षररमणीयत्व मनाला भावणारे आहे.

वाऱ्याची लहरी खुले
त्यातचि नवदृष्टि फुले
त्या स्पर्शे ह्रदय भुले
हो हो आकाश झुले
डोळ्यांनी रंगविले
श्वासांनी नृत्य दिले,
नावाला जणु नटले,
– काव्य जाहले ! (कवन)

कळीचे फूल व्हावे इतक्या सहजतेने ही कविता स्फुरली आहे असे येथे जाणवते. सृजनप्रक्रियेच्या संदर्भात 'उमाळा' मधील 'कुहू' ही कविता लक्षणीय वाटते.

वाहता वसंताचा वारा ।
संपे वांझपणाचा कोंडमारा ।
दुमदुमे दिग्देश सारा ।
'कुहू' रवे ॥

यातील 'कुहू' हा स्वर सृजनशीलतेचा अंतःस्त्रोत आहे. 'वाहता वसंता चा वारा' या अनुप्रासयुक्त लयबद्ध प्रतिमेतून मूर्तिमंत चैतन्याच्या ओथंबलेपणाचा स्पर्श होतो. नूतन कोंभाच्या कोवळ्या अस्तित्वामुळे वांझपणाचा कोंडमारा कुठच्या कुठे लुप्त होतो. 'कुहू, कुहू' च्या नादनिनादाने दिग्देश दुमदुमतो. अन मग नवल वर्तते.

जिवाचा घेतला घोट ।
झाला त्याचा उरी स्फोट ।
ब्रह्मांड कटाहाचा तट ।
फुटला स्फुट ॥

शब्द आणि ब्रह्मतत्त्व यांमध्ये अद्वैत असते. ब्रह्मतत्त्व व्यक्तिमात्राच्या अंतर्यामी अव्यक्त रूपात असते. व्यक्त होण्यासाठी त्याची धडधड असते. आत्मविलोपामुळे शब्दमाध्यमाद्वारे त्याचा स्फोट होतो. 'अणोरणीयान्' पण 'महतो महीयान्' शक्तीचा साक्षात्कार कविमनाला होतो. ही अनुभूती रसिकह्रदयाला निरंतर आनंद देते. अंतराळात निनादण्याऱ्या 'कुहू' स्वराप्रमाणेच !

कविवर्य बेंद्रे यांची कविता प्राधान्याने अंतर्मुख प्रवृत्तीच्या कविमनातून स्फुरलेली कविता आहे. 'उमाळा' या संग्रहातील त्यांच्या बहुतेक कविता म्हणजे 'मौनाच्या वीणेवर उमटलेले ते नवीन सूर आहेत'. लोकांतापेक्षा एकान्तात रमणारी, नातवंडांशी निरागसपणे संवाद करणारा कुटंबवत्सल कवीही लपलेला आहे. हे या संग्रहातील काही कविता वाचताना प्रत्ययास येते. 'कुणा देवतेची प्रतिमा' व 'फुलवात' या कवितांतून बेंद्रे यांनी आपली नात प्रतिमा हिच्या विषयीच्या आत्मीयतेने भावना व्यक्त केल्या आहेत :

कुणा देवतेची प्रतिमा । घरा आली आज
कुठे भेट कुठली गाठ । काय संचिताची
अपूर्व ही शोभा आली । स्नेह भाविकाची
कशी म्हणू माझी नात । देवाघरची
फुलवात
(फुलवात)

'आला प्रतिमेचा घोडा', 'आरती', 'ध्वनी', ॥ 'बू' ॥ 'पाळणा', 'आठवली नाती', 'नात' आणि 'आशीर्वाद' या कवितांतूनही तिचे कोडकौतुक त्यांनी केलेले आहे. कविवर्य बेंद्रे यांनी पत्नीनिधनानंतर काही शोकगीते लिहिली. त्यातील काही शोकगीते 'उमाळा' मध्ये समाविष्ट केलेली आहेत.

कविवर्य बेंद्रे यांनी 'पहा हो गरिबांची बाळे' या कवितेत बेचाळीसच्या क्रान्तिकालात स्वतःचे दैन्यदारिद्य बाजूला ठेवून आत्मसमर्पण करणाऱ्या माणसांविषयी सहानुभूती व्यक्त केली आहे. त्यांच्या ह्रदयात विश्व खेळते. ही माणसे अश्रूंनी जखमा पुसतात. धक्का बसला तरी हसतात. त्यांच्या स्वार्थत्यागी वृत्तीचे कवी दर्शन घडवितो :

जरी मिळेना काही खाया
ह्रदयी तुडुंब भरली माया ।

युद्धाचा हा वणवा पसरे
प्रेमाचा तो झरा पाझरे
त्यात फुलती उपवन हे हसरे
पहा हो।

लौकिक जगातिल विसंगतीवर, स्वार्थी वृत्तीवर कवीने वेळोवेळी प्रहार केलेला आहे. जगाची रीत खोटी आहे. स्वार्थांधांची दाटी सर्वत्र आहे असे त्याला वाटते.

स्वहेतू पोटी परहित ओठी
जगाची रीत हीऽ खोटी
कुणाच्या साठी ऽ । देहाच्या भेटी
गाठीऽ ।
हे जगजेठी । जगाच्या पाठी
जिवाचीऽ आशा मोठी (जगाची रीत)

समाजाच्या गतानुगतिक प्रवृत्तीवर त्याने कठोर शब्दात भाष्य केले आहे. सगळे संतवाङ्मय वाचूनही समाजाने त्यापासून बोध मात्र काहीच घेतला नाही असे त्याला वाटते.

भावार्थ दीपिका जळते शिखामंडित
अरण्यरोदन करिती अरण्यपंडित
वाचती काळोखात अखंडीत
वर्तमान तेच तेच (पाठ्यपुस्तक)

कवीने हुंड्यासारख्या अमानुष प्रथेवर नर्मविनोदी स्वरात मर्मभेदक प्रकाश टाकला आहे :

बँक-बुकाचा अभिप्रेतार्थ
तोच मुख्य - इतर व्यर्थ
पाहणे बहाणे, नुसता स्वार्थ
दुसरे नव्हते "और" काही
(वधूची निवड)

ही अनिष्ट प्रथा कोणालाही नाहीशी करता आलेली नाही याविषयी कविमनाला खंत वाटते :

प्रेमाचे करूनी हसे जणु पिसे
कामात्मता वावरे
हुंड्याचा यमपाश हा अजुनि का
कोणासही नावरे ?
(सोनू)

प्रचारकी थाटाच्या या कविता नसून त्यामागे सामाजिक व्यथावेदनांशी एकरूप होऊ पाहणारे संवेदनशील मन आहे.

'उमाळा' मधील द. रा. बेंद्रे यांच्या काव्यातील ठळक प्रवृत्तींचा विचार संक्षिप्त स्वरूपात करण्याचा प्रयत्न येथे केला आहे. पण त्यांच्या प्रज्ञेचा आवाका फार मोठा असल्यामुळे त्यांच्या काव्याचे क्षितिज आपल्या आकलन कक्षेत आले असे ठामपणे सांगता येत नाही. लौकिकापेक्षा अलौकिक जगतात रमणारी त्यांची अंतर्भेदी प्रतिभा होती. या श्रेष्ठ जीवन साधकाच्या मनः प्रवृत्तीचे प्रतिबिंब कवितेत उमटलेले आहे. कविवर्य बेंद्रे हे व्रतस्थ कवी होते. कौटुंबिक जीवनापासून विश्वरहस्यापर्यंत त्यांची तरल प्रतिमा विहार करीत असे. रवींद्रनाथ टागोरांप्रमाणे जे जे मानवी आहे ते ते त्यांना मननीय वाटे. त्यांच्या या विचारमंथन प्रक्रियेचे सुमधुर नवनीत 'उमाळा' च्या रूपाने मराठीत उपलब्ध झालेले आहे. मराठीतील चिंतनगर्भ काव्याला नवीन मिती देणारे हे काव्य आहे हे निश्चित. कन्नड आणि मराठी काव्यक्षितिजावर कविवर्य बेंद्रे यांच्या कवितेचे विलोभनीय इंद्रधनुष्य रसिकमनाला आल्हाद देत राहील. ❐